Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

# भारताचा विदेशी व्यापार : एक दृष्टिक्षेप

परशुराम बळीराम माने,
श्री.शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय (स्वतंत्र), बारड,
ता. मुदखेड, जि. नांदेड.

## प्रस्तावना :

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये त्या देशाचा विदेशी व्यापार हा महत्वाची भूमिका बजावीत असतो. जगातील प्रत्येक देशाचा आर्थिक विकास हा त्या देशाने इतर देशांबरोबर व्यापारी संबंध प्रस्थापित केल्यानंतर झपाट्याने झाल्याची इतिहास साक्ष देतो. कोणताही देश त्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकत नाही. त्यासाठी प्रत्येक देशाला इतर देशांवर अवलंबून राहावेच लागते. परकीय देशांशी केल्या जाणाऱ्या व्यापाराने देशातील गरजा तर भागतातच पण त्याच बरोबर देशातील उपलब्ध वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात होऊन परकीय चलन मिळते व त्या देशाची अर्थव्यवस्था भक्कम बनते. अविकसीत तसेच विकसनशील देशांना आपल्या देशाचा जलदगतीने आर्थिक विकास करण्यासाठी यंत्रसामुग्री तसेच भांडवली वस्तूंची विकसीत देशांकडून आयात करावी लागते. कृषीप्रधान, अविकसीत व विकसनशील देशांना सुरुवातीला आयातीवर अवलंबून राहावे लागते, परंतु कालांतराने त्या देशांच्या निर्यातीमध्ये वाढ घडून येत असते. ज्या देशामध्ये नैसर्गिक साधनसामुग्री मुबलक प्रमाणात आहे त्या देशांनी त्या-त्या वस्तूंचे उत्पादन करुन निर्यात केल्यास तो देश जलदगतीने आर्थिकदृष्ट्या विकसीत बनतो. कृषीप्रधान देशांनी देशामध्ये कृषी वस्तूंचे अधिक उत्पादन करुन त्या वस्तूंची निर्यात केली पाहिजे व भांडवलप्रधान देशांनी आपल्या देशात भांडवली वस्तूंची निर्मिती करुन भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात केल्यास त्या देशांमध्ये परस्पर सहकार्य निर्माण होऊन दोन्ही देशांचा विकास जलदगतीने घडून येतो.

व्यापारवादी आर्थिक विचारवंतांनी विदेशी व्यापार हे आर्थिक विकासाचे इंजिन आहे असे म्हटले आहे. देशाच्या आर्थिक विकासात विदेशी व्यापाराचे महत्व लक्षात घेऊनच व्यापारवादी विचारसरणीने मुक्त व्यापार धोरणाचा आग्रह धरला होता. फ्रेडरिक लिस्ट या जर्मन अर्थशास्त्रज्ञाच्या मते, "एखाद्या देशाच्या आर्थिक विकासाची परमोच्च अवस्था गाठली जाईपर्यंत त्या देशातील उद्योगांना संरक्षण देण्याचा आणि देशातील उद्योगांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाल्यानंतर मात्र खुल्या व्यापाराचा पुरस्कार करावा." याच विचारसरणीनूसार प्रत्येक देश आज आपल्या देशातील उद्योगांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संरक्षण देऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये निर्यात वाढविण्याची व नवीन बाजारपेठ काबीज करण्यासाठी स्पर्धा करीत आहेत.

प्राचीन तसेच मध्ययूगीन काळामध्ये भारताचा इतर देशांशी मोठ्या प्रमाणात विदेशी व्यापार होत

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

होता याचे दाखले मिळतात. भारतातील हस्तकलेच्या वस्तू, जड-जवाहिरात, सोन्या-चांदीच्या वस्तू, मसाल्याचे पदार्थ इत्यादी वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात होत होती. ब्रिटीशांच्या राजवटीत त्यांनी मोठ्या प्रमाणात भारतातील वस्तूंची आपल्या देशात निर्यात केली. ब्रिटीशांनी भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा भरमसाट वापर करुन ही साधन संपत्ती, कच्चामाल, शेतीमाल मोठ्या प्रमाणात यूरोपखंडामध्ये पाठविला. तसेच यूरोपातून त्या कच्च्यामालावर प्रक्रिया करुन तयार होणारा पक्कामाल भारतात आयात करुन विकला. त्यामुळे ब्रिटीशांच्या काळात भारतामध्ये उद्योगधंद्यांची वाढ व विकास होऊ शकला नाही उलट देशातील प्रचलीत हस्तोद्योग व कुटीरोद्योगांचा ऱ्हास झाला.

देशाच्या आर्थिक विकासामध्ये आयात व निर्यात हे दोन्ही पैलू महत्वाचे असतात. देशामध्ये भांडवली वस्तूंची आयात करणे व देशातून पक्कामाल तयार करुन निर्यात करणे हे देशाच्या विकासाच्या दृष्टिने हिताचे असते. त्यामुळेच भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर औद्योगिक विकासावर लक्ष केंद्रित केले. औद्योगिकीकरणातून निर्यातीस प्रोत्साहन देण्यात आले. कारण निर्यातीवर भर दिल्यामूळे देशामध्ये दुर्मिळ परकीय चलनाचा साठा वाढतो तसचे देशी वस्तूंना परदेशात मागणी निर्माण होऊन मोठी बाजारपेठ प्राप्त होते, त्याचप्रमाणे उत्पादनवाढीस चालना मिळून रोजगाराच्या संधीत वाढ होते आणि आंतरराष्ट्रीय बाजारात देशाची प्रतिष्ठा ऊंचावते. भारतामध्ये सन १९५१ पासून नियोजनास सुरुवात झाली आणि तेंव्हापासून सरकारने निर्यातीस प्रोत्साहन देणे सुरु केले. सुरुवातीच्या काळामध्ये देशात औद्योगिक विकास, कृषीक्षेत्राचा विकास तसेच देशातील पायाभूत सुविधांचा विकास न झाल्यामुळे देशातील निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण जास्त होते.

## आर्थिक योजना काळातील भारताचा विदेशी व्यापार :

ब्रिटीश कालावधीमध्ये देशाचा आर्थिक विकास झाला नाही म्हणून तो साध्य करण्यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात पंचवार्षीक योजनेस सुरुवात करण्यात आली. या पंचवार्षिक योजनेमध्ये अविकसीत क्षेत्राचा विकास घडवून आनण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. त्यातूनच अविकसीत क्षेत्राचा विकास करुन निर्यातीस प्रोत्साहित करण्यात आले. पूढे जाऊन देशाची निर्यात अधिकाधिक व्हावी यासाठी सरकारने वेळोवेळी समित्या स्थापन करुन त्यांच्या शिफारशी मान्य केल्या. त्यापैकीच श्री. मुदलियार समिती (सन १९६२), श्री. आबिद हुसेन यांच्या अध्यक्षतेखालील समिती (सन १९८४) तसेच सन १९९१ मध्ये परराष्ट्रीय व्यापारमंत्री श्री. चिदंबरम यांनी सरकारचे नवे व्यापारी धोरण मांडून भारताने मुक्त व्यापारी धोरण राबवावे असे सूचविले. या विविध समित्यांच्या शिफारशी सरकारने मान्य केल्यामुळे देशाच्या निर्यातीत वाढ होत गेली. परंतु देशाच्या निर्यातीत वाढ होत असतांनाच देशाच्या आयातीमध्येदेखिल मोठी वाढ होऊन व्यापार शेष वाढत गेला. भारतातील पंचवार्षीक योजना काळातील निर्यात, आयात आणि व्यापार शेष पूढील तक्त्या क्र. १ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

**तक्ता क्र. १**

**पंचवार्षीक योजना काळातील भारताचा विदेशी व्यापार**

(कोटी रु. मध्ये)

| अ.क्र. | पंचवार्षीक योजना | निर्यात | आयात | व्यापार शेष |
|---|---|---|---|---|
| १ | पहिली पं. यो. (१९५१-५२ ते १९५५-५६) | ६२२ | ७३० | -१०८ |
| २ | दुसरी प. यो. (१९५५-५६ ते १९६०-६१) | ६१३ | १०८० | -४६७ |
| ३ | तिसरी पं. यो. (१९६०-६१ ते १९६५-६६) | ७४३ | १२२४ | -४७७ |
| ४ | वार्षीक योजना (१९६६-६७ ते १९६८-६९) | १२३६ | १९२५ | -६८९ |
| ५ | चौथी पं. यो. (१९६९-७० ते १९७३-७४) | १८१० | १९७२ | -१६२ |
| ६ | पाचवी पं. यो. (१९७४-७५ ते १९७७-७८) | ४४७२ | ५२३१ | -७४० |
| ७ | वार्षीक योजना (१९७८-७९ ते१९७९-८०) | ८९३५ | ११३८५ | -२४५० |
| ८ | सहावी पं. यो. (१९८०-८१ ते १९८४-८५) | ८९६७ | १४६८३ | -५३९० |
| ९ | सातवी पं. यो. (१९८५-८६ ते १९८९-९०) | १७३८२ | २५१४४ | -७७३० |
| १० | वार्षीक योजना (१९९०-९१ ते १९९१-९२) | ५४५७९ | ६७११९ | -१२५४० |
| ११ | आठवी पं. यो. (१९९२-९३ ते१९९६-६७) | ८६२५७ | ९७६०९ | -११३५२ |
| १२ | नववी पं. यो. (१९९७-९८ ते २००१-०२) | १६८४०१ | २०४७६४ | -३६३६३ |
| १३ | दहावी पं. यो. (२००२-०३ ते २००६-०७) | १५०४२१८ | २०२०८९३ | -५१६९४४ |
| १४ | २००७-०८ | ६५५८६४ | १०१२३१२ | -३५६४८८ |
| १५ | २००८-०९ | ८४०७५५ | १३७४४३६ | -५३३६८० |

**Sources :** Economic Survey of India – 2009-10

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, पहिल्या पंचवार्षीक योजनेपासून ते दहाव्या पंचवार्षीक योजनेपर्यंत तसेच अकराव्या पंचवार्षीक योजनेमध्ये देशाच्या निर्यातीमध्ये वाढ होत असतांना निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण जास्त आढळते. त्यामूळे देशातील व्यापार शेषात दरवर्षी वाढ होतांना आढळून येते.

दुसऱ्या महायुद्धामुळे जगातील सर्व देशांनी आपल्या देशातील आयातीवर निर्बंध लादल्यामुळे भारताने देखिल स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्ये आयातीवर निर्बंध लादून देशातील निर्यात वाढविण्यासाठी रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले व निर्यात वाढीस प्रोत्साहन देण्यात आले. परंतु हा देशातील विकासाचा प्रारंभीक काळ असल्यामुळे या काळात निर्यातीपेक्षा (६२२ कोटी रु.) आयात (७३० कोटी रु.) जास्त राहिली व व्यापार शेष (-१०८ कोटी रु.) निर्माण झाला. दुसऱ्या पंचवार्षीक योजना

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

काळामध्ये आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री, कच्चामाल यांच्या आयातीस परवाने देण्यात आले. तसेच निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी व अधिकाधिक निर्यात व्हावी यासाठी निर्यात कोटा पद्धत रद्द करण्यात आली. त्यामुळे याकाळात पहिल्या पंचवार्षीक योजनेच्या तुलनेत निर्यात कमी होऊन (६१३ कोटी रु.) आयात (१०८० कोटी रु.) वाढली व याकाळात व्यापार शेष (-४६७ कोटी रु.) जास्त राहीला.

तिसऱ्या पंचवार्षीक योजना काळामध्ये चीनचे आक्रमण, पाकिस्तानशी युद्ध तसेच या काळात रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यामुळे याकाळात युद्धजन्य वस्तू व अन्नधान्याची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागली. त्यामुळे याकाळात -४७७ कोटी रु. एवढा व्यापार शेष निर्माण झाला. ह्यावर उपाय योजना करण्यासाठी सरकारने मुदलियार समितीची नेमणूक करुन त्यांच्या शिफारशी मान्य केल्या. त्यांनी निर्यात उद्योगांना कच्चा मालाचा सवलतीच्या दराने पुरवठा करणे, निर्यात उत्पन्नावर प्राप्तीकर लावणे, निर्यातीच्या प्रमाणात आयात सवलती देणे, निर्यात संवर्धन मंडळाची स्थापना करणे इत्यादी शिफारशी केल्या होत्या. परंतु पूढे जाऊन सन १९७३ नंतर पेट्रोलियमच्या किंमती वाढल्याने आयात खर्चामध्ये वाढ होऊन व्यापार शेष अधिकच वाढला.

परदेशी तंत्रज्ञानाचा देशातील उद्योगांच्या विकासासाठी वापर व्हावा आणि देशातील उत्पादक साधन संपत्तीचा महत्तम वापर व्हावा ह्या उद्देशाने सन १९७५ नंतर देशामध्ये हळूहळू आयात खुली करुन निर्यातीवर भर देण्याचे प्रयत्न करण्यात आले. परंतु जागतीक मंदीमुळे पूरेशी मागणी वाढू न शकल्याने निर्यातीमध्ये वाढ झाली नाही. उलट निर्यातीपेक्षा आयातीत वाढ झाल्यामुळे सरकारला जागतीक नाणेनिधीकडून कर्ज घ्यावे लागले. जागतीक नाणेनिधीकडून कर्ज घेतल्यामुळे त्यांनी भारतीय बाजारपेठ विदेशी व्यापारासाठी मुक्त करण्याचे निर्बंध घातले व त्यातून सन १९८५ नंतर भारताने हळूहळू खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे धोरण स्विकारण्यास सुरुवात केली. सन १९९१ मध्ये व्यापारी धोरणात आयात परवान्याचे धोरण रद्द करुन आयातीची निर्यातीशी सांगड घालण्यात आली. तसेच अनेक वस्तू निर्यात बंधनातून मुक्त करण्यात आल्या. यामुळे देशातील आयात अधिक व सोपी झाली. देशातील आयात ही निर्यातीपेक्षा जास्त राहिली व व्यापार शेषात वाढ होत गेली. याऊलट परकीय देशांनी देशातील उद्योगांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या संरक्षण दिले. त्यामुळे त्यांची आयात कमी राहिली व निर्यात वाढली. परंतु भारतामध्ये याऊलट परिस्थिती निर्माण झाली. म्हणून सन २००८-०९ मध्ये देशातील निर्यात ८,४०,७५५ कोटी रु. एवढी होती तर आयात १३,७४,४३६ कोटी रु. एवढी होती. म्हणजेच या वर्षी भारताचा व्यापार शेष हा -५,३३,६८० कोटी रु. एवढा झाला होता. देशाचा वाढता व्यापार शेष हा देशाला घातक असतो. कारण हा वाढता व्यापार शेष भरुन काढण्यासाठी परकीय कर्ज घ्यावे लागते व या परकीय कर्जासोबत देशावर अनेक निर्बंध लादले जातात.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

**भारतातील निर्यातीचे वर्गीकरण :**

भारतामधून ज्या वस्तूंची निर्यात केली जाते त्यास साधारणतः चार भागामध्ये वर्गीकृत केले जाते.

१) **कृषी आणि कृषी आधारीत वस्तू :** यामध्ये चहा, कॉफी, तंबाखू, काजू, गरम मसाल्याचे पदार्थ, साखर, कापूस, तांदूळ, मासे, मांस, वनस्पती तेल, फळे, भाजीपाला, दाळी इत्यादी वस्तूंचा समावेश होतो.

२) **खनिज पदार्थ :** यात मॅगनिज, कच्चे लोखंड तसेच अभ्रकांचा समावेश केला जातो.

३) **निर्मित किंवा उत्पादीत वस्तू :** यामध्ये सूती कापड, शिवणकाम केलेले कपडे, चामड्याच्या वस्तू, हस्तशिल्प, अभियांत्रिकीवस्तू इत्यादी वस्तूंचा समावेश केला जातो.

४) **खनिज तेल :** यात पेट्रोलियम वस्तू तसेच इंधनाचा समावेश केला जातो.

वरील वस्तूंची भारतातून निर्यात होते. या प्रत्येक क्षेत्राचा एकूण निर्यातीमधील वाटा पूढीलप्रमाणे आढळून येतो.

**तक्ता क्र. : २**

**भारतातील निर्यातीचे वर्गीकरण**

(कोटी रु. मध्ये)

| अ.क्र. | घटक | १९७०-७१ | १९८०-८१ | २००८-०९ |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी आणि कृषी आधारीत वस्तू | ४८७ (३१.७) | २०५७ (३०.६) | ७७७८३ (९.२५) |
| २ | खनिज पदार्थ | १६४ (१०.७) | ४१३ (६.२) | ३५५२९ (४.२) |
| ३ | निर्मित किंवा उत्पादीत वस्तू | ७७२ (५०.३) | ३७४७ (५५.८) | ५६६१५६ (६७.४) |
| ४ | खनिज तेल | १३ (०.८) | २८ (०.४) | १२७३२४ (१५.१) |
| ५ | इतर | ९९ (६.५) | ४६५ (६.९) | ३३९७३ (४.०) |
| | **एकूण** | **१५३५ (१००.०)** | **६७१० (१००.०)** | **८४०७५५ (१००.०)** |

**Sources :** Economic Survey of India - 2009-10

**टिप :** कंसातील आकडे एकूणशी प्रमाण दर्शवितात.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016


वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, भारतातील निर्यातीमध्ये सतत वाढ होत आहे. एकूण निर्यातीमध्ये निर्मित किंवा उत्पादीत वस्तूंचा सर्वाधिक वाटा (६७.४%) आढळून येतो तर त्याखालोखाल खनिज तेल (१५.१%) व कृषी क्षेत्राचा (९.२५%) वाटा आहे. सन १९७०-७१ च्या तूलनेमध्ये सन २००८-०९ मध्ये कृषी वस्तूंची निर्यात कमी झाली आहे. याउलट निर्मित वस्तूच्या निर्यातीमध्ये वाढ झाली आहे. त्यातही अभियांत्रिकी वस्तूंची सर्वाधिक निर्यात होते. देशामध्ये सर्वाधिक लोकसंख्या कृषी क्षेत्रावर आधारीत असूनदेखील या क्षेत्राचा एकूण निर्यातीमध्ये वाटा फारच कमी आढळून येतो. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये याच क्षेत्राचा एकूण निर्यातीत वाटा सर्वाधिक होता.

## विदेशी व्यापाराची दिशा :

आज भारत जगातील जवळपास १९० देशांना विविध प्रकारच्या साडेसात हजारांहून अधिक वस्तूंची निर्यात करतो तर जवळपास १४० देशांकडून सहा हजारांहून अधिक वस्तूंची आयात करतो. एकूण निर्यातीपैकी ६०% निर्यात ही प्रगत देशांमध्ये केली जाते. जगातील विविध देशांशी भारताची होणारी निर्यात पूढील प्रमाणे आहे.

**आकृती क्र. : १**

**भारतामधून विविध देशांशी होणाऱ्या निर्यातीतील वाटा**




वरील आकृतीवरुन असे दिसून येते की, भारताकडून होणाऱ्या एकूण निर्यातीपैकी सार्वाधिक निर्यात ही आशियाई खंडातील देशांशी (२८.०%) केली जाते. तर त्याखालोखाल युरोपीय संघ (२१.२%),

पेट्रोलियम निर्यातक देश (२१.१%) या देशांमध्ये केली जाते. तसेच सर्वात कमी निर्यात ही पूर्व युरोप मध्ये (१.१%) व ओपेक संघटनेतील देशांमध्ये (२.८%) होते.

थोडक्यात एकूण निर्यातीपैकी सर्वाधिक निर्यात ही प्रगत देशांशी व आपल्या आशिया खंडातील देशांमध्ये होते.

## सारांश :

भारतामधून होणाऱ्या विदेशी व्यापारावरुन असे दिसून येते की, जगातील एकूण निर्यातीमध्ये भारतातील निर्यातीचे प्रमाण फार कमी (१.४%) आहे. याऊलट भारतातील योजना काळास सुरुवात करण्यापूर्वी म्हणजे सन १९५०-५१ मध्ये जागतिक व्यापारात भारताचा वाटा हा २.१% एवढा होता. म्हणजेच योजनाकाळामध्ये भारताच्या निर्यातीत वाढ झालेली असली तरीही एकूण जागतिक निर्यातीमध्ये भारतीय निर्यातीचा वाटा कमी झाला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये (ब्रिटीश राजवटीत) भारतामधून हस्तकलेच्या वस्तू तसेच कृषी आणि कृषी आधारीत वस्तूंची सर्वाधिक निर्यात होत असे परंतू स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यात सतत घट होतांना आढळून येते.

भारतातील निर्यातीमध्ये सध्या अभियांत्रिकीवस्तूंची सर्वाधिक निर्यात होते. भारत सरकारने देशातील उद्योगांना प्रगत देशातील उद्योगांप्रमाणे प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या संरक्षण दिल्यास अजूनही निर्यातीत वाढ होऊ शकते. त्याचप्रमाणे देशातील कृषी उत्पादनास चालना देऊन व कृषी माल साठवणूकीच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास तसेच जास्तित जास्त कृषी वस्तूंच्या निर्यातीवरील बंधन काढून टाकल्यास अधिकाधिक कृषी माल चांगल्या अवस्थेमध्ये निर्यात होऊ शकतो. सरकारने देशामध्ये कृषी उत्पादनास व औद्योगीकीकरणास चालना देऊन तसेच आयात पर्यायीकरणाचा अवलंब केल्यास देशाची आयात कमी होऊन निर्यात वाढू शकते व देशाचा व्यापार शेष देखील कमी होऊ शकतो. परिणामत: भारताला परकीय कर्जाची आवश्यकतादेखील भासणार नाही.

## संदर्भ :

१) प्रतियोगिता दर्पण, *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रतियोगिता दर्पण, आगरा, २०११.

२) गौरव दत्त, अश्विनी महाजन, *दत्त एवं सुंदरम-भारतीय अर्थव्यवस्था*, एस. चन्द एण्ड कंपनी, नई दिल्ली, २०११.

३) *Economic Survey of India-2007-08*, Government of India, Ministry of Finance, Economic Division, Printed by the manager, Govt. of India Press, Minto Road, New Delhi.

4) Rajkumar Sen & Biswagit Chatterjee, *Indian Economy,* Deep and Deep Publication Pvt. Ltd., New Delhi, 2003.

5) Uma Kapila, Indian Economy, Academic Foundations, New Delhi, 2004.